अग्रतश्चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः ।
इदं ब्राह्ममिदं क्षात्रं शापादपि शरादपि ॥

# चित्तपावन मित्र



|| सर्व मंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणी नमोस्तुते ||



## शारदीय नवरात्रौत्सव व दसऱ्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...!




वर्ष ४८ वे

अंक १० वा

१० ऑक्टोबर २०२६

किंमत १ रुपया


### || श्री महा अष्टमी दर्शन ||

महाअष्टमी पूजन : रविवार दि. १८ ऑक्टोबर २०२६
दर्शनाची वेळ : सायंकाळी ७ नंतर
ठिकाण : श्री परशुराम भवन, डॉ. बापये सभागृह

## संस्थेचा श्री गणेशोत्सवाची क्षणचित्रे...



डॉ. पद्मजा जोशी यांनी स्वहस्ते बनविलेली श्रीं ची मूर्ती





डॉ. सत्येन जोशी आणि डॉ. पद्मजा जोशी यांच्या हस्ते श्री गणेश प्रतिष्ठापना



श्री. संजय परांजपे व सौ. सुनिता परांजपे यांच्या हस्ते श्रीं ची आरती



अथर्वशीर्ष पठण



श्री. विजय साने यांची नाशिक मर्चंट्स को - ऑपरेटिव्ह मल्टिस्टेट बँकेच्या अध्यक्षपदी निवड



ज्येष्ठ नागरिक मंच स्नेहमिलन उत्साहात

# श्री महा अष्टमी उत्सव



सालाबादप्रमाणे याही वर्षी शारदीय नवरात्रानिमित्त अष्टमी उत्सव चित्तपावन संस्थेतर्फे करण्यात येत आहे. श्री महालक्ष्मी अष्टमी उत्सव या वर्षी रविवार दि. १८ ऑक्टोबर रोजी संपन्न होत आहे. ज्यांची पूजेची वर्षे आहेत त्यांनी आपली नावे संस्थेच्या ऑफिसमध्ये किंवा सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे यांच्याकडे नोंदणी करून रु. ४००/- भरावेत. तसेच ज्यांना प्रसाद भोजनाचा लाभ घ्यायचा असेल त्यांनीही ऑफिसमध्ये किंवा सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे यांच्याकडे रुपये ४०० देऊन आपल्या नावाची नोंदणी करावी. आयत्या वेळेस येणाऱ्यांना कुपन दिले जाणार नाही.

**पूजेची वेळ –** सकाळी दहा वाजता.

**पूजेसाठी आणावयाचे साहित्य –** हळदी कुंकू, ताम्हण, पळी भांडे, निरंजन व त्यात घालण्यासाठी तूप वात, उगाळलेले चंदन, कापूर कापूरदाणीसह, उदबत्ती, काडेपेटी, दहा विड्याची पाने, दहा सुपाऱ्या, फळे, खारीक, बदाम प्रत्येकी पाच, दोन नारळ, सुट्टे पैसे, दुर्वांच्या दोन जुड्या, गूळ खोबरे, जानवी जोड, कापसाची वस्त्रे दोन, अक्षता, दूध साखरेचा नैवेद्य, अत्तर, काजळ डबी, दुर्वांचा अखंड १६ पेरांचा तातू, न मिळाल्यास दोन-तीन जुड्या दुर्वांच्या आणाव्यात.

**पूजेसाठी लागणारी पत्री–** आघाडा, दुर्वा, धोत्रा, बेल, चाफा, शेवंती, केवडा, आंबा, बोर, बकुळ, प्राजक्त, तुळस, मालती, अशोक, हादगा, माका, शमी, रुई, कण्हेरी यापैकी शक्य असतील तीच पत्री आणावीत. बाजारात विकत मिळणारी पत्री किंवा माहित नसलेली पत्री आणू नयेत. दुर्वांचा तातू सोळा पेराचा असावा. रेशमाचा तातू व पंचामृत, खडे संस्थेतून मिळतील.

**सूचना –** पूजेसाठी येताना पारंपारिक वेष परिधान केलेला असावा. हातामध्ये काचेच्या बांगड्या, कपाळाला कुंकू असावे. केस बांधलेले असावेत. आपले पूजेचे साहित्य स्वच्छ व चांगल्या प्रतीचे असावे. पूजेसाठी मिळणाऱ्या छोट्या सुपाऱ्या आणू नयेत. फळे दोन आणली तरी चालतील पण ती खाण्याजोगी असावीत. जे आपण स्वतः खातो ते देवाला द्यावे. ज्यांच्या पूजेची पाच वर्षे पूर्ण झाली असतील त्यांनी उद्यापनासाठी वायनदान आणावे. त्यामध्ये नवेकोरे सूप, खण, नारळ, ओटीचे सामान, कंगवा, करंडा, बांगड्या, गळसरी, ओटीसाठी तांदूळ, नारळ, सुपारी, विडा दक्षिणा, म्हणजे सौभाग्यवायन असावे. संध्याकाळची दर्शनाची वेळ साडेसातच्या नंतर सुरु होईल. संध्याकाळी दर्शनाला येताना पारंपारिक वेश असावा. काळे कपडे घालू नयेत.

अष्टमीच्या श्री महालक्ष्मी मुखवट्यासाठी तांदूळ, साडी, प्रसाद, फुलांचा साज इ. आणि उत्सवासाठी देणगी देऊ इच्छिणाऱ्यांनी आपले नावे व रोख रक्कम संस्थेच्या ऑफिसमध्ये देऊन रितसर पावती घ्यावी. जमलेल्या देणगीतूनच संस्थेमार्फत त्याचा विनियोग केला जाईल.

**अष्टमी पूजा व प्रसादासाठी नाव नोंदणी व शुल्क ऑनलाइन भरण्यासाठी खालील क्रमांकांवर संपर्क साधावा.**

सौ. सुवर्णा सहस्त्रबुद्धे : मोबाईल : ९४२२९४२७०४

अथवा – ऑफिस श्री परशुराम भवन

संपर्क-०२५३/२५७६२४१. मोबा.: ८३२९८९६८७८

ऑफिसची वेळ – सकाळी १० ते २ सायंकाळी ४ ते ७

पूजेची वेळ : सकाळी १० वा. व दर्शनाची वेळ : सायं. ७ वाजेनंतर

नेहमीप्रमाणे ऑनलाइन दर्शनाची व्यवस्था करण्यात येणार आहे.

## महालक्ष्मी देवीच्या मूर्ती चा ढाचा शिल्पकार श्री. संदीप लोंढे यांच्याकडून संस्थेस भेट

संस्थेचे सभासद आणि प्रसिद्ध शिल्पकार श्री. संदीप लोंढे यांनी संस्थेस अष्टमी पूजेच्या वेळी स्थापित करण्यात येणाऱ्या श्री महालक्ष्मी च्या मूर्तीचा (चेहरा सोडून) नवीन स्वरूपातील ढाचा घडवून दिला आहे. आधी मातीचे मॉडेल तयार करून त्यावर प्लास्टरचा साचा करून त्यापासून फायबरचा टिकाऊ स्वरूपाचा ढाचा तयार केला व नंतर त्यांनी त्यावर योग्य रंगसंगतीचे पी यु चे आवरण केले. हा ढाचा अत्यंत मजबूत, टिकाऊ आणि सुबक असा झाला आहे.

विशेष बाब म्हणजे श्री. संदीप लोंढे यांनी या कामासाठी कोणतेही मूल्य स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला व विनामोबदला हा ढाचा संस्थेस भेट दिला आहे. श्री. संदीप लोंढे यांनी देवीची सेवा मानून केलेल्या या कार्याची प्रशंसा करावी तेव्हढी थोडीच आहे. शिल्पकार श्री. संदीप लोंढे यांचे संस्थेच्या वतीने व खास करून स्नेहबंध महिला मंडळाच्या वतीने मनःपूर्वक आभार.

## भोंडला

सालाबाद प्रमाणे आपला भोंडला मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ५.०० वा. आपल्या संस्थेच्या डॉ. लेले सभागृहात होणार आहे. तरी जास्तीत जास्त मैत्रिणींनी सहभागी व्हावे.

# संस्थेचा श्री गणेशोत्सव उत्साहात
## उत्सवादरम्यान पार पडलेल्या कार्यक्रमांचा सर्वांनी घेतला आनंद...

**श्री गणेश प्रतिष्ठापना :** मागील वर्षीप्रमाणेच डॉ. पद्मजा जोशी यांनी स्वहस्ते बनविलेली श्रीं ची मूर्ती संस्थेस दिली होती व त्याच मूर्तीची प्रतिष्ठापना डॉ. सत्येन जोशी व डॉ. पद्मजा जोशी यांच्या हस्ते सोमवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२६ रोजी संस्थेच्या श्री परशुराम भवन येथील डॉ. लेले सभागृहात करण्यात आली. या वेळी संस्थेचे कार्यकारी मंडळातील सदस्य तसेच विश्वस्त व इतर सभासद उपास्थित होते.

**श्री गणपती अथर्वशीर्ष :** प्रतिष्ठापनेच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता श्री गणपती अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम संपन्न झाला. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संस्थेचे सभासद श्री. संजय परांजपे यांनी परिश्रम घेतले. पठणानंतर श्री. संजय परांजपे व सौ. सुनिता परांजपे यांच्या हस्ते श्रीं ची आरती करण्यात आली.

**श्री गणेश विसर्जन :** शनिवार दिनांक १९ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी श्री गणेशाचे विसर्जन करण्यात आले. यावेळी कार्यकारणी सदस्य, व संस्था कर्मचारी उपस्थित होते.

**पंडित भाग्येश मराठे यांची शास्त्रीय गायनाची मैफिल :** रविवार, दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता संस्थेच्या पावन स्वर उपक्रमांतर्गत मुंबई येथील ख्यातनाम युवा शास्त्रीय गायक व पंडित राम मराठे यांचे नातू पंडित भाग्येश मराठे यांची शास्त्रीय गायनाची मैफिल संस्थेच्या डॉ. बापये सभागृहात आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमात पंडित भाग्येश मराठे यांनी सुरुवातीला राग पूरवी तसेच उत्तरार्धात जोगकंस रागातील बडा ख्याल सादर करून पंडित राम मराठे यांच्या गाजलेल्या 'हरी मेरो जीवन प्राण' या भैरवीतील बंदिशीने मैफिलीची सांगता केली. दोन तासांहून अधिक रंगलेल्या या पूर्णपणे शुद्ध शास्त्रीय मैफिलीमध्ये उपस्थित रसिक मंत्रमुग्ध झाले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संगीत नाटक अकादमी, राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित आणि पंडित राम मराठे यांचे पुत्र पंडित मुकुंद मराठे यांच्या हस्ते नासिक एज्युकेशन सोसायटीच्या त्रैवार्षिक निवडणुकीत अध्यक्षपदी प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्षपदी ॲड. जयदीप वैशंपायन, कार्यकारिणी सदस्यपदी श्री. देवदत्त जोशी, श्रीमती मैथिली गोखले व डॉ. मनीष बापये बिनविरोध निवडून आल्याबद्दल; तसेच संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने यांची नाशिक मर्चंट्स को-ऑप बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. याचबरोबर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार देखील या प्रसंगी करण्यात आला. पंडित भाग्येश मराठे व साथीदारांचा परिचय संस्थेचे सभासद, सुरकल्प फौंडेशन चे अध्यक्ष पंडित डॉ. आशिष रानडे यांनी करून दिला व कलाकारांचा सन्मान संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने यांच्या हस्ते करण्यात आला.

पंडित भाग्येश मराठे यांना तबल्यावर श्री. सुजित काळे यांनी तर हार्मोनियमवर सिद्धार्थ कर्वे यांनी सुरेख साथ-संगत केली. या मैफिलीला रसिक श्रोत्यांचा उदंड प्रतिसाद लाभला.

# श्री. विजय साने यांची नाशिक मर्चंट्स को-ऑप. मल्टिस्टेट बँकेच्या अध्यक्षपदी निवड

संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने यांची नाशिकच्या सहकार बँकिंग क्षेत्रातील अग्रणी अशा नाशिक मर्चंट्स को - ऑपरेटिव्ह मल्टिस्टेट बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. गेल्या सुमारे २५ वर्षांहून अधिक काळ श्री. साने हे बँकेच्या संचालक मंडळावर निवडून येत आहेत व या आधी ३ वेळा त्यांनी बँकेचे अध्यक्ष पद भूषविले आहे.

श्री. विजय साने यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

# गायक श्री. विवेक केळकर यांना श्रीयोग ग्लोबल फाऊंडेशन चा पुरस्कार

आपले सभासद व नाशिकमधील ख्यातनाम गायक श्री. विवेक केळकर यांना श्रीयोग ग्लोबल फाउंडेशन या संस्थेतर्फे साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. संगीत क्षेत्रातील त्यांच्या योगदानाबद्दल हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. श्री. विवेक केळकर यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा..!

# मातृत्वाचा जागर : शास्त्रातील दिव्य आदर्श आणि संस्कारांचे सनातन अधिष्ठान

शारदीय नवरात्रोत्सवाचा पावन काळ म्हणजे केवळ आदिमायेच्या नवदुर्गा रूपांची आराधना नव्हे, तर आपल्या संस्कृतीत आणि परंपरेत वाहणाऱ्या मातृशक्तीचा कृतज्ञतापूर्वक केलेला सन्मान आहे. स्त्री ही सृजनाची अधिष्ठात्री आहे; परंतु तिचे मातृत्व केवळ एका देहाला जन्म देण्यापुरते मर्यादित नसते. आपल्या ऋषीमुनींनी आणि प्राचीन शास्त्रांनी मातृत्वाला एक 'तपस्या' मानले आहे. आई तीच, जी बालकाच्या जिवात्म्याला केवळ ऐहिक सुखांची वाट न दाखवता, अंतिम सत्याची आणि उदात्त जीवनमूल्यांची ओळख करून देते.

आज जीवनसंध्येच्या समृद्ध उंबरठ्यावर, वयाच्या पन्नाशी-ऐंशीच्या टप्प्यावर उभ्या असलेल्या पिढीने आपल्या घरादारांतून हीच संस्कार, परंपरा पाहिली आणि जगली आहे. पुढील पिढीच्या हाती हाच दीप सुपूर्द करण्यासाठी, आपल्या शास्त्रांतील त्या उत्तुंग मातांचे स्मरण करणे आणि त्यातील मूळ 'बीज-संस्कारां'चे मर्म समजून घेणे ही आजच्या काळाची गरज आहे.

**१. गर्भाधान :** देवहूतीने साध्य केलेले उच्च आत्म्याचे आवाहन श्रीमद् भागवतात कर्दम ऋषी आणि माता देवहूती यांचा गृहस्थाश्रम हा केवळ संसाराचा भाग नसून तपाचे मूर्तिमंत रूप होता. देवहूतीने अंतःकरणातील शुद्ध भक्ती, संयम आणि विरक्तीच्या बळावर एका अलौकिक आत्म्याला आपल्या गर्भात आमंत्रित केले. साक्षात सांख्यशास्त्राचे प्रणेते कपिल मुनी तिच्या उदरी अवतरले. गर्भाधान म्हणजे केवळ जैविक मिलन नसून, एका उन्नत आणि ज्ञानी आत्म्याला आकृष्ट करण्यासाठी आई-वडिलांनी केलेली मनःशुद्धी आणि चित्ताची एकाग्रता होय, हे शास्त्राने फार पूर्वी अधोरेखित केले आहे.

**२. मातृचित्ताचा प्रभाव :** कयाधू, उत्तरा आणि गर्भाचे अभेद्य रक्षण गर्भस्थ जीव हा मातेच्या प्रत्येक सूक्ष्म भावाचे आणि परिसराचे मूक ग्रहण करत असतो.

**✻ माता कयाधू :** असुर कुळात असूनही देवर्षी नारदांच्या आश्रमातील शांत, सात्त्विक आणि भगवद् गुणांनी भारलेल्या वातावरणात माता कयाधूने काळ व्यतीत केला. तिने ऐकलेले हरिकीर्तन गर्भातील प्रल्हादाच्या अंतःकरणात झिरपले आणि जन्मापूर्वीच एका 'भागवत शिरोमणी'ची जडणघडण झाली.

**✻ माता उत्तरा :** अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राने गर्भावर आघात केला, तेव्हा माता उत्तराने मानवी आधारांऐवजी साक्षात योगेश्वर श्रीकृष्णाची कास धरली. तिची आर्तता इतकी उत्कट होती की भगवंताने गर्भात जाऊन परीक्षित राजाचे रक्षण केले. मातेची आंतरिक श्रद्धा आणि शांत भाव गर्भाभोवती प्रत्यक्ष संरक्षणाचे वलय निर्माण करते, हाच खरा संस्कार.

**३. शिशुसंस्कार आणि बालमनावरील दिशा :** सुनिती, सुमित्रा आणि मदालसा जन्मानंतर बालकाच्या कोऱ्या मनावर दिशा देण्याचे आद्य कर्तव्य मातेचे असते.

**✻ माता सुनीती :** सावत्र आईने राजसिंहासनावरून हाकलून दिल्यावर रडणाऱ्या ध्रुवाला तिने कटुता शिकवली नाही; उलट ''ज्याने सृष्टी निर्माण केली, त्या जगन्नियंत्याच्या मांडीवर बसण्याची पात्रता मिळव'' असा मार्ग दाखवून त्याचे रूपांतर अढळपद मिळवणाऱ्या भक्तात केले.

**✻ माता सुमित्रा :** आपल्या पुत्रांना प्रभू श्रीराम आणि भरताच्या चरणी समर्पित राहण्याचे, त्यागाचे आणि निरपेक्ष सेवेचे बाळकडू पाजले.

**✻ ब्रह्मवादिनी मदालसा :** पाळण्यात झुलवतानाच ती बाळाला सांगायची, ''शुद्धोऽसि बुद्धोऽसि निरंजनोऽसि'' (तू शुद्ध आहेस, बुद्ध आहेस, निर्विकार आहेस). बालपणापासूनच मदालसाने मुलांना आत्मज्ञानाची दृष्टी दिली.

**४. वात्सल्य आणि मातृकवच :** यशोदा, देवकी आणि कुंती

**✻ माता यशोदा :** बालकृष्णावर संकटे आली, तेव्हा पूतना वधानंतर तिने गाईच्या पुच्छाने कृष्णाला ओवाळून विष्णूच्या द्वादश नावांचे 'रक्षाकवच' घातले. बालकाच्या देहाबरोबरच त्याच्या आत्मिक स्वास्थ्यासाठी प्रार्थना करणे, हे वात्सल्याचे सर्वोच्च रूप होते.

**✻ माता देवकी व कुंती :** देवकीने अखंड संकटातही श्रद्धा ढळू दिली नाही, तर कुंतीने संकटांमध्येही मुलांची मने भगवंताशी आणि धर्माशी जोडलेली राहावीत एवढीच याचना केली.

**चिंतन :** प्राचीन अधिष्ठान आणि आजचे वास्तव, आज आधुनिक काळात 'गर्भसंस्कार' या संकल्पनेला बऱ्याचदा केवळ काही व्यावसायिक तंत्रे, ठराविक गाणी किंवा कृत्रिम पॅकेजेसपुरते मर्यादित केले जाते. परंतु शास्त्रांचा अभ्यास केला तर लक्षात येते की,

संस्कार म्हणजे बाजारात मिळणारी कोणतीही बाह्य वस्तू नसून ती आई-वडिलांच्या जीवनशैलीची, सात्त्विक आहाराची, विचारांच्या शुद्धतेची आणि निरंतर साधनेची निष्पत्ती आहे. या नवरात्रीत आदिमायेचे नमन करताना, बाह्य उत्सवापलीकडे जाऊन आपल्या कुटुंबातल्या, संस्कृतीतल्या या शाश्वत संस्कार-परंपरेचे पुनरुज्जीवन करणे आणि पुढील पिढ्यांपर्यंत ही निकोप दृष्टी पोहोचवणे, हीच खरी जगदंबेची आराधना ठरेल.

**वैद्य : सौ. वैदेही संजीवन देवधर**
**आयुर्वेदाचार्य, नाशिक.**
**मो.: ९२२५११२२१६**

## ज्येष्ठ नागरिक स्नेह मिलन कार्यक्रम उत्साहात संपन्न

गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी ACJ ( आम्ही चित्तपावन ज्येष्ठ) या whatsapp ग्रुपमधील सदस्यांच्या स्नेहमिलनाचा छोटेखानी कार्यक्रम श्री. रवींद्र व सौ. राधिका गोडबोले यांच्या घरी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सर्वश्री मुंगसे, गानू, कुंटे, जोशी, जोगळेकर, गोडबोले व रानडे तसेच श्रीमती गानू, जोशी, मराठे, गोडबोले व वाड हे सदस्य सहभागी झाले होते.

यावेळी ग्रुपमधील सदस्यांमध्ये अनेक विषयांवर खेळीमेळीत चर्चा झाली. सर्वांनी एकत्रितपणे आंबेजोगाई येथील श्री योगेश्वरी देवीच्या दर्शनाला जावे असा मनोदय व्यक्त केला. तसेच ग्रुपमधील सदस्यांची एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी एक दिवसाची सहल काढण्याचेही ठरले. श्री. व सौ. गोडबोले या कलासक्त दाम्पत्याची बॅडमिंटन खेळाडू असलेली १० वर्षांची नात रेवा हिने तिच्या सुस्वर आवाजात छानसं शास्त्रीय गाणं गाऊन दाखवलं. घराण्यातील ही तिसरी पिढीही गायन वादन क्षेत्र गाजवणार याची खात्री पटली. गोडबोले दाम्पत्याचे प्रशस्त अभिरूची संपन्न निवासस्थान सर्वांना खूप आवडले. सौ. राधिका गोडबोले यांनी सर्वांसाठी चविष्ट व रूचकर अल्पोपहाराची चोख व्यवस्था केली होती. अशा प्रकारे हा स्नेह मिलनाचा कार्यक्रम संस्मरणीय ठरला. **- श्री. प्रमोद रानडे**

## नाशिक एज्युकेशन सोसायटी च्या अध्यक्षपदी प्रा. दिलीप फडके, उपाध्यक्ष पदी ॲड. जयदीप वैशंपायन तर कार्यकारिणी सदस्यपदी डॉ. मनीष बापये, श्रीमती मैथिली गोखले व श्री. देवदत्त जोशी बिनविरोध

नाशिक एज्युकेशन सोसायटी च्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत प्रा. दिलीप फडके अध्यक्ष, ॲड. जयदीप वैशंपायन उपाध्यक्ष तर कार्यकारिणी सदस्यपदी श्री. देवदत्त जोशी, श्रीमती मैथिली गोखले, डॉ. मनीष बापये यांची बिनविरोध निवड झाली. संपूर्ण निवडणूक बिनविरोध झाली. संस्थेच्या वतीने सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन !

### चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक
## देणगीदार - सप्टेंबर २०२६

| क्रमांक | देणगीदाराचे नाव | देणगी रक्कम |
|---|---|---|
| | श्री. सुधीर बाळकृष्ण फडके | २५,०००/- |



## भावपूर्ण श्रद्धांजली...

- संस्थेचे सभासद ,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक, जनजाती कल्याण आश्रमचे क्षेत्रीय कार्यकर्ते आणि 'अभाविप'चे पूर्व कार्यकर्ते प्रा. वसंत परशुराम जोशी सर यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. पंचवटी महाविद्यालयातील प्राध्यापक ते असंख्य कार्यकर्त्यांचे मार्गदर्शक आणि कुटुंबवत्सल पालक अशी विविधांगी भूमिका सरांनी आयुष्यभर निभावली. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती देवो. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली ...



## भावपूर्ण श्रद्धांजली...

- संस्थेचे आजीव सभासद श्री. वसंत चिंतामण पटवर्धन यांच्या मातोश्री श्रीमती कमल चिंतामण पटवर्धन यांचे दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी वयाच्या ९६व्या वर्षी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास सद्गती देवो. संस्थेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली...

## पावन स्वर कार्यक्रमाची क्षणचित्रे...




पावन स्वर कार्यक्रमात पंडित भाग्येश मराठे
तबल्यावर श्री. सुजित काळे व हार्मोनियम वर सिद्धार्थ कर्वे





कार्यक्रमास उपस्थित रसिक श्रोते

पंडित मुकुंद मराठे यांच्या हस्ते ना.ए.सोसायटी च्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत बिनविरोध निवडून आलेल्या सर्वांचा सत्कार



प्रा. दिलीप फडके



डॉ. मनीष बापये



ॲड.जयदीप वैशंपायन



श्रीमती मैथिली गोखले



श्री. देवदत्त जोशी





पंडित मुकुंद मराठे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय साने यांची नाशिक मर्चंट्स को-ऑप. मल्टिस्टेट बँकेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पंडित मुकुंद मराठे यांच्या हस्ते सत्कार



अध्यक्ष श्री. विजय साने यांच्या हस्ते पंडीत भाग्येश मराठे यांचा सत्कार






## चित्तपावन ब्राह्मण संघ : वधू यादी

| नाव, पत्ता व फोन | जन्मतारीख | गोत्र | उंची | शिक्षण | मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| कुमारी वरदा श्रीकृष्ण साठे<br>४०१, दक्ष फ्लोरा, सिरीन मेडोज, गंगापूर रोड, नाशिक - १३. मो. ९२२५१९२९८९ | ०१/१०/१९९९ | वसिष्ठ | ५'.७'' | एम.कॉम. | ----- |

चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक या संस्थेच्या मालकीचा हा अंक संपादक व **प्रकाशक श्री. विजय राजाराम साने,** यांनी श्री गणेश एंटरप्राईजेस, शिवनेरी कॉम्प्लेक्स, वावरे लेन, शिवाजी रोड, शालीमार, नाशिक येथे छापून **'श्री परशुराम भवन'**, स्टेट बँकेसमोर, सी.बी.एस. नाशिक-४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

**चित्तपावन ब्राह्मण संघ, नाशिक. फोन : ०२५३-२५७६२४१**

प्रति, ______________________

______________________

______________________

**संस्थेची वेबसाईट :-**

- Email ID : nasikchitpavan@gmail.com
- http://facebook.com/nasikchitpavan
- Website : www.nasikchitpavan.org
- http://twitter.com/nasikchitpavan
- http://youtube.com./user/nasikchitpavan

या मासिकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील सर्व मते व विचार हे सर्वस्वी त्या त्या लेखकांचे आहेत. जाहिरातदारांनी जाहिरातीत केलेल्या निवेदनाला संपादक जबाबदार नाहीत. ग्राहकांनी जाहिरातीतील उत्पादनांची व नमूद केलेल्या बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करून पाहावी. 'चित्तपावन मित्र'च्या मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादकांचा या गोष्टींशी काहीही संबंध नाही.

RNI - Regd No. 35688 / 20-11-1979
सवलतीच्या दराची तिकिटे लाऊन पोस्टाने पाठविण्याचा परवाना NSK / RNP-231/2021-2023
सदर अंक दर महिन्याच्या १० तारखेस प्रसिद्ध होऊन नाशिक G.P.O. मधून वितरित केला जातो.